रे.क.नं. १८/२०२२
नि.१५/क लगत

<u>**उलटतपास सुरु, प्रतिवादीतर्फे वकील श्री. जे. के. देसाई वकील**</u>

प्रतिवादी व माझे घर समोरासमोर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा दावा व गट क्र. ७७६ च्या मिळकतीचा संबंध नाही. प्रस्तुत दाव्यात दावा मिळकत म्हणून गट क्र. ७७६ ही मिळकत समाविष्ट केलेली आहे. फेरफार क्र. ६७२४ हा गट क्र. ७७६ या मिळकतीशी संबंधित आहे. या दाव्यासोबत असलेले गट क्र. ७७६ च्या संदर्भातील खरेदीपत्र मी वाचून पाहिलेले आहे. गट क्र. ७७६ च्या मिळकतीच्या चतुःसिमा मला माहित आहेत पण सांगता येणार नाहीत. गट क्र. ६७६ या मिळकतीच्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. गट क्र. ६७६ च्या मिळकतीचे क्षेत्रफळ १२ गुंठे इतके आहे. गट क्र. ६७६ च्या दक्षिणेला शालन शामराव गायकवाड यांची मिळकत आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, शालन गायकवाड या प्रतिवादीच्या आई आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, गट क्र. ६७६ मध्ये सन २००० पासून ऊसाचे पीक आहे असे ७/१२ला नमूद आहे. वादग्रस्त खरेदीपत्रातील मिळकतीचा क्र. ६७६ आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, प्रस्तुत प्रकरणात दावा मिळकतीतील ऊस माझ्या किंवा माझ्या वडीलांच्या नावे गेल्याबाबत पावत्या दाखल केल्या नाहीत. आम्ही या प्रकरणात तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, प्रतिवादी हे दावा मिळकतीचा उपभोग सन २००६ पासून घेत आहेत व तसेच मी माझ्या तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये नमूद केलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मूळ जमीनी नरु जोती ख्रिस्ती व धोंडी नारु ख्रिस्ती यांच्या वारसांनी विभागून घेतल्या. हे म्हणणे बरोबर आहे की, रामजी कृष्णा व लक्ष्मण यांची त्याच्यात्याच्या हिश्याप्रमाणे स्वतंत्र वहिवाट आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, रामजी, कृष्णा व लक्ष्मण यांचे वारस देखील त्यांच्यात्यांच्या हिश्यात स्वतंत्र वहिवाट करतात व ७/१२ स्वतंत्र झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की,७/१२ प्रमाणे आमच्या वहिवाटीचा व प्रतिवादीच्या वहिवाटीचा एकमेकांशी काही संबंध नाही. सन २०११ पासून माझी पत्नी गांधी हॉस्पीटल, नवे पारगांव येथे नोकरी करते. मी कोडोली येथे २०१८ मध्ये नोकरी केलेली आहे. मी सरतपासाच्या शपथपत्रातील परि. क्र. ४ मध्ये नमूद केलेला साधा स्टॅम्प या कामात हजर केलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, कृष्णा यांच्या पश्चात त्यांचे क्षेत्र सुज्ञान व सुमित्र यांच्याकडे गेले. माझे वडील व चुलते आनंदा यांना मिळालेले क्षेत्र लक्ष्मण यांच्या पश्चात मिळालेले आहे. हे म्हणणे खरे नाही

की, माझे चुलते आनंदा यांनी काही जमीन सुमित्र यांना दिली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मुदत खरेदी दिली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, चतुःसिमा नोंद असलेल्या दस्ताप्रमाणे मुदत खरेदी दिली होती. मुदत खरेदी दिलेल्या जमीनी आजरोजी सुमित्र यांच्या कब्जेवहिवाटीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, १४ गुंठे जमीन ही डेव्हीड यांची खरेदी घेतलेली मिळकत आहे. साक्षीदार स्वतःहून परत सांगतो की, सदरील जमीन खरेदी घेतली आहे परंतु वडिलार्जित आहे. मी धर्मगुरु म्हणून काम करतो.

हे म्हणणे बरोबर आहे की, आमचा वडिलार्जित व्यवसाय शेती आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, गावात आल्यानंतर शेतीत जाणे हे माझे काम असते.

प्रश्नः तुम्ही ब-याच बाहेर ठिकाणी नोकरी करता त्यामुळे तुम्ही गावाकडे येऊन जाऊन असता?

उत्तरः खूपच कमी वेळा येतो.

(मध्यंतरामुळे उलटतपास तहकूब. दोन्ही विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. २१/१२/२०२३.

**ए. ए. कोरे**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा